भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम, मुंबई.
☐ मुकेशने गायलेलं 'याद रहेगा...' व लताबाईंनी गायलेले 'आईना वही रहता है...' ही गाणी कोणत्या चित्रपटातील? हे चित्रपट केव्हा पडद्यावर आलले होते. कलाकार-संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?
— मुकेशचे गाणे *उम्रकैद* या चित्रपटातले आहे. १९६१ला हा चित्रपट आला होता. शेख मुख्तार, सुधीर नाझिमा, मुकरी, हिरालाल, हेलन, सुलोचना हे या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते. संगीतकार इकबाल कुरेशी, निर्माता दिग्दर्शक अस्पी एच. ईराणी, दुसरं गाणं *शालिमार* या चित्रपटातले. १९७८ला हा चित्रपट आला होता. कलाकार धर्मेंद्र, झीनत अमान, रेक्स हॅरिसन, सिखिया माईल्स, जॉन सॅक्सन, शम्मी कपूर, ओ. पी. रल्हन, संगीतकार आर. डी. बर्मन, निर्माता सुरेश शहा, दिग्दर्शक कृष्णा शहा.

भरत टिकेकर, मुंबई.
☐ आचार्य अत्रेनी कोणकोणते चित्रपट दिग्दर्शित केले?
— *मोरूची मावशी, ब्रह्मघोटाळा, ही माझी लक्ष्मी, श्यामची आई, महात्मा फुले* हे मराठी व *परिंदे* हा हिंदी.
☐ *श्यामची आई*चे संगीतकार कोण?
— वसंत देसाई.
☐ सुलोचनाबाईंना कोणकोणत्या चित्रपटासाठी महाराष्ट्र सरकारचा सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला आहे?
— *प्रपंच, संत गोराकुंभार* या चित्रपटासाठी.
☐ संगीतकार सी. रामचंद्रनी कोणकोणत्या चित्रपटात अभिनय केलाय?
— *नागानंद, धनंजय, धर्मपत्नी* या चित्रपटात.

मारुती गणपत कोळी, पेण.
☐ व्यंकटेशचा पहिला हिंदी चित्रपट कोणता? नायिका व दिग्दर्शक कोण?
— १९९३चा *अनाडी* व्यंकटेशचा पहिला हिंदी चित्रपट. नायिका करिश्मा कपूर. दिग्दर्शक के. मुरली मोहनराव.
☐ धर्मेंद्रचा *मेरा गाव मेरा देश* केव्हा पडद्यावर आला होता? नायिका, निर्माता-दिग्दर्शक कोण?
— *मेरा गाव मेरा देश* १९७१ ला पडद्यावर आला होता. नायिका आशा पारेख. निर्माता वोलू खोसला लेखराज, दिग्दर्शक राज खोसला.

अविनाश पाटील, पुणे.
☐ ग. दि. माडगूळकरांनी कोणकोणत्या चित्रपटांत भूमिका केल्या?
— *पहिला पाळणा, बहिर्जी नाईक, जय मल्हार, लोक शाहीर रामजोशी, पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, अंमलदार, बोलविता धनी, माझी जमीन, सौभाग्य, जगाच्या पाठीवर, वऱ्हाडी वाजंत्री* या चित्रपटात. मा. विनायक यांच्या अनेक चित्रपटांत ते एक्स्ट्रा म्हणून लहानसहान भूमिकेत चमकले होते.
☐ लता मंगेशकरनी लता मंगेशकर या नावाने एखाद्या चित्रपटात संगीत दिलंय का?
— १९५०च्या *राम राम पाव्हणं* या चित्रपटाला त्यांनी लता मंगेशकर या नावानेच संगीत दिलं.

सुभाष शिंदे, कोल्हापूर.
☐ वसंत पवार यांनी कोणकोणत्या मराठी चित्रपटांना संगीत दिलं?
— *पठ्ठे बापूराव, केतकीच्या बनात, बाळा जो जो रे, शिवलीला, चिमणी पाखरं, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी, अबोली, महात्मा, बेबी शशी, शुभ मंगल, पुनवेची रात, गाठ पडली ठका ठका, जगावेगळी गोष्ट, पसंत आहे मुलगी, पायदळी पडलेली फुलं, झाकली मूठ, प्रीतिसंगम, दोन घडीचा डाव, लोकशाहीर अनंत फंदी, पुनर्जन्म, राजा गोसावीची गोष्ट, सुखाचे सोबती, सांगत्ये ऐका, साताजन्माचे सोबती, अवघाची संसार, पैशाचा पाऊस, पंचारती, संगत जडली तुझी अन माझी, मानिनी, शाहीर परशुराम, वैजयंता, रंगल्या रात्री अशा* (छोटा गंधर्व व दत्ता डावजेकर यांच्यासह) *वरदक्षिणा, माझा होशील का? नार निर्मिते नरा, सुभद्राहरण, तू सुखी राहा, काय हो चमत्कार, सवाल माझा ऐका, वाट चुकलेले नवरे, मल्हारी मार्तंड.*

अतुल वारे, करमाळा.
☐ सचिनने कोणकोणत्या चित्रपटात गाणं गायलंय?



भुताचा भाऊमध्ये वर्षा उसगावकर-सचिन

— *गंमत जंमत, माझा पती करोडपती, भुताचा भाऊ.*

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.
☐ 'फूल गेंदवा न मार...', 'ये रात्र ये चांदनी ये हवा सुन जा दिल की दास्तान...' व 'कही दाग न लग जाए...' ही गाणी कोणकोणत्या चित्रपटातील? गायक व संगीतकार कोण?
— 'फूल गेंदवा न मार...' हे गाणं *दूज का चांद* या चित्रपटातील गायक मन्ना डे, संगीत रोशन. 'ये रात ये चांदनी...' हे गाणं *जाल* या चित्रपटातील. गायक हेमंतकुमार व लता. संगीत एस. डी. बर्मन, 'कही दाग न लग जाये...' गाणं *मेरा नाम जोकर* या चित्रपटातील. गायिका आशा भोसले. संगीत शंकर-जयकिशन.

रामकृष्ण पाटोळे, अ. नगर.
☐ हृदयनाथ मंगेशकरनी संगीत दिलेला पहिला चित्रपट कोणता?
— *आकाशगंगा.*
☐ 'ऐ प्यासे दिल बेजूबॉं...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील? पडद्यावर कोणी गायलंय?
— हे गाणं *बेगुनाह* या चित्रपटातील शंकर-जयकिशन या संगीतकार द्वयीपैकी जयकिशन यांच्यावर हे गाणं चित्रित करण्यात आलं होतं आणि ते मुकेशने गायलं होतं.
☐ *मदर इंडिया*पासून प्रेरणा घेऊन निर्माण झालेला मराठी चित्रपट कोणता?
— *अरे संसार संसार.*

जगदीश भोसले, मुंबई.
☐ प्रबोधनकार ठाकरेंनी एखाद्या चित्रपटात भूमिका केलीय का?
— *श्यामची आई* व *महात्मा फुले* या दोन चित्रपटात प्रबोधनकार ठाकरेनी भूमिका केली होती आणि कलगीतुराची कथा लिहिली होती.
☐ राजा गोसावी, शरद तळवलकर या जोडीने कोणकोणत्या मराठी चित्रपटांत एकत्र भूमिका केली?
— *अखेर जमलं, लाखांची गोष्ट, मी तुळस तुझ्या अंगणी, दोन घडीचा डाव, याला जीवन ऐसे नाव, अवघाची संसार, जगाच्या पाठीवर, लग्नाला जातो मी, संगत जडली तुझी अन् माझी, आधी कळस मग पाया, बाप माझा ब्रह्मचारी, प्रीती विवाह, सोनियाची पाऊले, वरदक्षिणा, वाट चुकलेले नवरे, कामापुरता मामा, सुधारलेल्या बायका, अती शहाणा त्याचा..., शेरास सव्वाशेर, श्रीमंत मेहुणा पाहिजे.* ●